Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४८ ] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर २७ -डिसेंबर ३, २०२५/अग्रहायण ६-१२, शके, १९४७ [पृष्ठे ३ किंमत : रुपये ३०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-३ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१० |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८४८.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ११ (१) ची सुधारीत अधिसूचना**

क्रमांक समअ-उपजि.भू. बावईप्रक्र-९-कावि-९१२-२०२५. -

ज्याअर्थी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे “उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११-२०१४- प्र.क्र. ७७- अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त अधिसूचना” असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,०००

हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस या सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन असाधारण क्रमांक ३८, दिनांक १३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतूदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची- पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, भंडारा यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी जे. पी. लोंढे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), बा.व.ई.प्र. क्र. ९, भंडारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १९ - एलक्युएन-२०२४- २०२५, मौजा- सिरसघाट, ता. भंडारा, जि. भंडारा.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर.मी. |
| १ | १३/१ | ०.१० |
| २ | १०९/१/१ | ०.१० |
| ३ | १२१/१/अ/१ | ०.१० |
| ४ | १२१/१/ब/१ | ०.१५ |
| ५ | १२३/१/अ/१ | ०.२० |
| ६ | १२३/ब/१ | ०.०८ |

**अनुसूची-एक**—चालू

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| | | हे. आर.मी. |
| ७ | १२५/१/१ | ०.२१.४७ |
| ८ | १२९/१/१/१ | ०.०६ |
| ९ | १२९/२/१ | ०.२० |
| १० | १३१/१ | ०.१० |
| | एकूण संपादित क्षेत्र .. | १.३०.४७ |

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :- गोसीखुर्द प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- गोसीखुर्द प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी.

समाजाला मिळणारे लाभ :- २५०८०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्या बरोबरच रोजगारातही वाढ होणे अपेक्षित आहे.

**अनुसूची- तीन**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदर संपादनामुळे बाधीत व्यक्तीचे विस्थापिन होणार नाही.

**अनुसूची- चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ (२) अनुषंगाने प्रकल्पाचे पर्यावरणीय प्रभाव निर्धारण झाले असल्याकारणाने SIA (सामाजिक प्रभाव निर्धारण) लागू नाही.

**अनुसूची- पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम. :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता. :- -निरंक-

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील. :- -निरंक-

**टीप** :-उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), बा. व. ई. प्र. क्र. ९, भंडारा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

भंडारा :
दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५.

**सावन कुमार** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.